# राजदंड

दोन अंकी नाटक

## ले. प्रल्हाद जाधव

**पात्र संयोजन:**

१. आई (५०)

२. प्रशांत (२५)

३. बाबा (५०)

४. संपदा (२५)

५.  अम्मी (५०)

६. अब्बा (५५)

७. सलीम (३०)

८. घोले (५०)

९. राणेबाई (४५)

१३. जयसिंग माने (३०)

१४.ताम्हणकर (५५)

१५. पुराणिक (५०)

१६. लोखंडे (५०)

१८. शिर्के (५०)

१९. ठोकळे (५५)

२०. सक्सेना (५०)

२१. सोमण (४५)

२२. सी. एम. (५०)

२३. पी. कुमार (५५)

२४. एसीपी गुप्ता (५५)

२५. इन्स्पेक्टर कदम (४०)

(तसेच चाळीशीतील दोन सिक्युरिटी ऑफिसर आणि पन्नाशीतील एक पट्टेवाला.)

**अंक पहिला / प्रवेश पहिला**

(सकाळ. प्रशांत उपाध्ये याचं घर. एका शाळेत शिक्षिका म्हणून काम करणारी त्याची आई देवपूजा करत आहे. देवासमोर निरांजन ओवाळते, उदबत्ती फिरवते, नमस्कार करते. प्रशांत इंटर्व्यूला जाण्याच्या तयारीने शर्ट घालून बटणे लावीत बाहेर येतो.)

आई : सदा सर्वदा योग तुझा घडावा

तुझे कारणी देह माझा पडावा

उपेक्षू नको गुणवंता अनंता

रघू नायका मागणी हेची आता

प्रशांत : झाली का पूजा? आटप लवकर डबा दे मला. (बॅगेत कागदपत्रे भरु लागतो)

आई : (नमस्कार करुन उठते)

प्रशांत : आज काय मागितलंस देवाकडं?

आई : दुसरं काय, रोजचंच ते! तुला नोकरी लागू दे, पाच नारळांचं तोरण वाहीन असं म्हटलं...

प्रशांत : म्हणजे नोकरी मी मिळवणार आणि नारळ देवाला... चांगला न्याय आहे!

आई : असं म्हणू नये प्रशांत. देवाच्या मर्जीशिवाय झाडाचं पानसुद्धा हलत नाही.

प्रशांत : मग इंटर्व्हुला तरी जाण्याची काय गरज आहे? देवानं डायरेक्ट अ‍ॅपॉइंटमेंट लेटर घरीच पाठवून द्यावं की ! (हसतो)

आई : (सात्विक संतापानं) हसतोस काय, पाया पड आधी ! (प्रशांत निमूटपणे आणि मनापासून पाया पडू लागतो. आई त्याच्या जवळ जाऊन त्याच्या पाठीवरुन हात फिरवीत) तुझे बाबा असते तर एवढ्यात नोकरी कर असं म्हटलं असतं का तुला? शिकवून खूप मोठं करायचं तुला असं स्वप्न होतं त्यांचं... पण शेवटी कर्मभोग!

प्रशांत : काही कर्माचे भोग वगैरे नसतात, व्यवस्थित होईल सगळं! भरपूर अभ्यास केलाय मी. तूच तयारी करुन घेतलीयस ना? (त्राग्यानं) मुख्याध्यापिका म्हणून रिटायर्ड झाल्यावरही हक्काचा विद्यार्थी मिळालाय ना घरातल्या घरात!

आई : हो रे बाबा! लहानपणापासून अगदी घाण्याला जुंपलेल्या बैलासारखा अभ्यास करुन घेतेय मी तुझ्याकडून... पण ते तुझ्याच भल्यासाठी ना? चौथीला स्कॉलरशीप मिळवलीस, दहवीला मेरीट लिस्टमध्ये आलास... पण हे सारं शिक्षण आता तुलाच उपयोगी पडणार आहे ना?

प्रशांत : डबा दे, मला उशीर होतोय.

आई : ( देत) घे! लेखी परीक्षेत चांगल्या मार्कांनी पास झालाहेस. इंटर्व्यूतसुद्धा नक्की पास होशील. कोणत्याही परिस्थितीत ही नोकरी मिळाली पाहिजे एवढं लक्षात ठेव. काय त्या पदाचं नाव?

प्रशांत : कम्युनिकेशन ऑफिसर! मंत्रालयातच पोस्टिंग आहे!

आई : हो, बरोबर ! सरकारी नोकरीचं महत्त्व अजूनही कमी झालेलं नाही.

प्रशांत : (हसत) एवढे दिवस काहीतरी धंदा कर, धंदा कर असं चाललं होतं, तो विचार सोडून दिलास वाटतं?

आई : नाहीतर काय, त्या पंतप्रधान रोजगार योजनेतील कर्जासाठी बँकेत चकरा मार-मारून पाय मोडायला आले. हा फॉर्म भरा... तो भरा... ओळखी आणा, गॅरन्टी द्या... आणि शेवटी काय झालं? एक लाख रुपयातले चाळीस हजार रुपये हे मधल्यामध्ये लुबाडणार... जाऊ दे ती आठवणही नको आणि ते कर्जही नको. त्यापेक्षा आपली नोकरीच बरी.

प्रशांत : हे बघ आई, तू काहीही काळजी करु नकोस... ही नोकरी मला मिळणार असं माझं मन सांगतंय मला. (हरवत) कम्युनिकेशन ऑफिसर क्लास वन! मंत्रालयात रुबाबात बसायचं, गाडीनं फिरायचं, गव्हर्नमेंट कॉलनीत घर, घरात फोन... पहिल्या पगारात तुला साडी घेईन आई...

आई : अरे हो हो हो! आधी इंटर्व्ह्यू तर होऊ दे!

प्रशांत : (तसाच हरवलेला) ताईला सांगेन पापड लाटणं थांबव आता, नवरा गेला तरी भाऊ जिवंत आहे तुझा... मिनू सारखी सायकल सायकल करतेय... तिला सायकल घेऊन देईन मस्तपैकी...

आई : तुझ्या तोंडात साखर पडो. कागदपत्रं घेतलीस ना सर्व?

प्रशांत : हो!

आई : डबा ठेवलास नीट?

प्रशांत : होऽऽऽय.

आई : सगळे प्रश्न नीट लक्षात ठेवलेयस ना?

प्रशांत : अगदी व्यवस्थित लक्षात ठेवलंय सर्व..

आई : मला सारखं वाटतंय प्रशांत–

प्रशांत : काय?

आई : भ्रष्टाचाराच्या मुद्यावर नक्की प्रश्न विचारला जाईल...

प्रशांत : मग विचारु दे की... अगदी तोंडपाठ केलंय मी ते उत्तर!

आई ज्ञ: (मुलाखत घेत असल्याप्रमाणं) मग सांग बरं, समाजातला वाढता भ्रष्टाचार रोखण्यासाठी काय करावं लागेल?

प्रशांत : (आवेशात)' चॅरिटी बिगिन्स ॲट होम' असं म्हटलं जातं, त्यामुळं समाजातला भ्रष्टाचार रोखायचा तर त्याची सुरुवात प्रत्येकानं स्वतःपासून केली पाहिजे. कितीही संकटं आली, कसोटीचे क्षण आले तरी भ्रष्टाचाराला बळी पडायचं नाही असा निर्धार केला पाहिजे प्रत्येकानं! भ्रष्टाचाराच्या विरोधात बोलणारी माणसं आज अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकी कमी दिसत असली, तरी तेवढाही विरोध फार महत्वाचा आहे; नाहीतर मग भ्रष्टाचार हीच योग्य जीवनपद्धती आहे असं मानायला लागतील लोक. आपण सर्वांनी, संपूर्ण ताकदीनिशी प्रमाणिकपणाचं मोल टिकवत जगत रहाणं हेच भ्रष्टाचाराला खरं उत्तर ठरेल. (मुद्यातून बाहेर येत गमतीनं) डिंग डाँग! ( भाबडेपणानं हसतो. आईसुद्धा खूश. गोड हळवं, आनंदी वातावरण. प्रशांत गिरक्या मारत आपला आनंद पुढील पद्यमय स्वगतातून व्यक्त करू लागतो– )

लिहून देतो आज तुला मी नाव कमावणार

ही नोकरी आहे माझ्यासाठी,

मलाच ती मिळणार!

आजवरी तू माझ्यासाठी परिस्थितीशी लढलीस शिकून मोठा व्हावे म्हणून सांग किती राबलीस म्हणून पहिल्या पगारातुनी तुला साडी घेणार, आणि मग हॉटेलमध्ये चायनिज खाऊ घालणार

ही नोकरी आहे माझ्यासाठी

मालाच ती मिळणार!

ताई माझी नवऱ्यामागे किती एकटी झाली? सन्मानाने जगण्याची तू तिला प्रेरणा दिली तिच्या लाडकीसाठी सुंदर सायकल मी घेणार दिवस सुखाचे पुन्हा आपुल्या जीवनात येणार

ही नोकरी आहे माझ्यासाठी

मलाच ती मिळणार!

रोज लढाई जगण्यासाठी, रोज नवे आव्हान पण झुंजायाची भीती न येथे तुझे असे वरदान

रातदिवस ना काही पाहता मेहेनत मी करणार तुझ्या आदर्शा समोर ठेवून जीवन घडवणार

बा आदब, वा मुलाहिजा, होशियाऽऽऽर

ही नोकरी आहे माझ्यासाठी,

मलाच ती मिळणार!

(बॅग उचलून गिरक्या मारत हसत हसत निघून जातो अंधार.)

अंक पहिला / प्रवेश दुसरा

( संपदा कर्णिकचे घर. घरात ती आणि तिचे वडील असे दोघेच. वडील आजारी, खाटेवर पडून. संपदाला इंटर्व्यूसाठी बाहेर पडायचे आहे. प्रमाणपत्रांची फाईल आणि एक-दोन पुस्तकं झोळीत ठेवते. पर्समध्ये पैसे नीट ठेवून पर्सही झोळीत ठेवते. तिने आपली सर्व कामे आटोपलेली आहेत फक्त वडिलांना औषध देणे बाकी आहे. त्याचं खोकणं अधून-मधून सुरू.)

संपदा : (बाटलीचं बूच उघडून औषध चमच्यात ओतून घेत) आ करा–

बाबा : (निर्विकार. दृष्टी शून्यात )

संपदा : तोंड उघडा बाबा, ओषध घेताय ना?

बाबा : (काहीही प्रतिक्रिया न देता गप्पच)

संपदा : असं काय करताय, बरं व्हायचंय ना? चला तोंड उघडा लवकर शहाण्यासारखं... (बळे बळे त्यांना औषध देते) अस्सं! व्हेरी गूड! (चमचा पुसून बाटलीचे बूच लावून बाटली जागेवर ठेवते. निघण्याच्या तयारीनं आपली पर्स, खांद्याची झोळी उचलते. वडलांना तशाच हतबल - करुण - निराशाजनक स्थितीत पाहून त्यांच्या

जवळ जाऊन त्यांच्या पाठीवरून हात फिरवत ) काय झालं? किती वेळा सांगायच बाबा, धीर सोडू नका म्हणून? सारं काही ठीक होईल...

बाबा : काय ठीक होणार आहे ? एवढं आयुष्य गेलं... काय ठीक झालं? किती दिवस ते उसनं अवसान आणत जगत राहायचं?

संपदा : बाबा प्लीज...

बाबा : कंटाळा आलाय अगदी ह्या जीवनाचा. कशासाठी घ्यायची ती औषधं? जीवपण जात नाही एकदाचा...

संपदा : प्लीज असं काही बोलू नका बाबा. ही एवढी नोकरी लागू द्या मला मग बघा दिवस कसे पालटतील ते!

बाबा : तुला जगायचं त्या खोट्या आशेवर तर खुशाल जगत रहा. पण मला मात्र एकदा विष देऊन मोकळं कर म्हणजे झालं...

संपदा : मग मला कुणाचा आधार आहे?

बाबा : तुझी तू समर्थ आहेस जगायला. शिकवण्या करुन पोट भरतेच आहेस ना !

संपदा : हो पण ह्या शिकवण्यांची काहीच आवड नाही मला. रोज तेच तेच शिकवत बसायचं. माझ्या ज्ञानाचा तिथं पाच टक्केसुध्दा वापर होत नाही. शिवाय दोन तीन हजार रुपयांसाठी दहा दहा तास राबायचं याला काय अर्थ आहे? ही नोकरी मिळाली की तुमची नीट काळजी घेण्याइतकी फुरसत नक्की मिळेल!

बाबा : तुला किती वेळा सांगितलं की, माझी काळजी करणं सोडून दे म्हणून?

संपदा : मला काही त्रास नाही होत तुमचा.

बाबा : हे बघ संपदा, तुला खरं सांगतो, तुला जर खरंच सुखी व्हायचं असेल तर या म्हाताऱ्याची अडगळ आधी दूर करुन टाक !

संपदा : ज्यानं जन्म दिला त्या बापाला अडगळ मानण्याइतकी कृतघ्न नाही मी.

बाबा : ( समाधानानं ) शोभतेस माझी मुलगी. भरून पावलो अगदी (संतापत) पण जी मला सोडून गेली तिचा मी कुणीच नव्हतो का? का त्या हरामखोराच्या मागं लागून गेली ती? काय डबोलं होतं त्याच्याकडं असं? (खोकल्याची उबळ येते. खोकताना जीव घाबरा होतो.)

संपदा : (त्यांच्या पाठीवरून हात फिरवीत) शांत व्हा बाबा, शांत व्हा ... डोक्यातून काढून टाका तो विषय. डॉक्टरांनी सांगितलंय ना त्रास करुन घ्यायचा नाही म्हणून!

बाबा : मला हौस आलेय त्रास करुन घेण्याची!

संपदा : (आवरत ) इथं डब्यात पोळ्या आहेत. भाजी गॅसवरच ठेवलीय पातेल्यात आणि भात कुकरमध्ये आहे... विसरु नका... नाहीतर संध्याकाळी परत आल्यावर जेवण जसंच्या तसं दिसायचं...

बाबा : हे बघ, तू कितीही नाही म्हणालीस तरी तुझ्या कोवळ्या वयातच माझा भार टाकलाय मी तुझ्यावर हे अगदी उघड दिसतंय... तो त्या सिंदबादच्या सफरीमधला ऐतखाऊ म्हातारा नाही का, त्या सिंदबादच्या मानगुटीवर बसत, अगदी तसाच मी तुझ्या मानगुटीवर बसलोय!

संपदा : संपला तो विषय आता, बस्स झालं...

बाबा : पण मी खोट बोलतोय का?

संपदा : प्रत्येकाच्या मदतीला धावून जायचात तुम्ही. ताटातला घास काढून द्यायचात भूकेल्या माणसाला. फॅक्टरीतले सगळे कामगार देव मानायचे तुम्हाला. ॲक्सिडेंटमध्ये पाय गेला तेव्हा घरी आले होते सगळेजण...

बाबा : त्याला वीस वर्षे झाली आता. दोन दिवस सहानुभूती दाखवून निघून गेले सगळे, पण त्यांना दोष देण्यात काही अर्थ नाही. मला खरं वाईट वाटतं ते तुझ्या आईचं... मला ह्या अशा स्थितीत आणि माझ्या एकुलत्या एक गुणी मुलीला सोडून दुसरा घरोबा करताना काहीच लाजशरम वाटली नाही सालीला!

संपदा : किती वेळा सांगितलं बाबा तुम्हाला, फेकून द्या ते भूतकाळाचं ओझं आणि भविष्याचा विचार करा.

बाबा : कसलं वर्तमान आणि कसलं भविष्य ! तो घरमालकाचा मुलगा जेव्हा इथं येऊन भाड्यासाठी उभा रहातो ना; तेव्हाच कळतं भविष्यात काय वाढून ठेवलंय ते! बघतो कसा तुझ्याकडं डोळे फाडून... संताप होतो जीवाचा. असं वाटतं डोळे फोडून टाकावे भडव्याचे! (संतापानं उबळ येते पुन्हा खोकू लागतात. संपदा त्यांना 'शांत व्हा' म्हणत पाणी देते)

संपदा : मला नोकरी मिळली की संपतील हेही दिवस. हक्काची गव्हर्नमेंट क्वार्टर मिळेल; चांगल्या सरकारी हॉस्पिटलमध्ये उपचार करून घेऊ मग तुमच्यावर... सुखाचे दिवस परत येतील बाबा...

बाबा : खरंच तुला असं वाटतं?

संपदा : मला खात्री आहे अगदी. कसून अभ्यास केलाय. माझा नंबर लागायलाच हवा.

बाबा : माझं एक ऐकशील का?

संपदा : काय?

बाबा : नोकरी लागल्यावर आधी लग्न कर. संसाराला लाग...

संपदा : लग्न जरुर करीन, पण एका अटीवर !

बाबा : कोणत्या?

संपदा : माझ्या बाबांसह स्वीकारणारा नवरा हवा मला...

बाबा : ( हसत) मग बहुतेक तुला अखंड कुमारिका म्हणूनच राहावं लागणार!

संपदा : (हसत) त्यालाही माझी काही हरकत नाही.

बाबा : जास्त शहाणपणा करू नको. निघ लवकर, उशीर होतोय. आणि हे बघ...

संपदा : काय?

बाबा : इंटर्व्ह्यूमध्ये जे प्रश्न विचारतील त्याची अगदी खरी उत्तरं द्यायची. येत नसेल तर सरळ नाही म्हणून सांगायचं पण खोटं बोलायचं नाही. काय?

संपदा : हो हो, डोन्ट वरी! अगदी लहानपणापासून ऐकत आलेय मी तुमचं सर्व ! (वाकून पाया पडते)

बाबा : यशस्वी हो. माझा आशीर्वाद आहे! (अंधार)

अंक पहिला / प्रवेश तिसरा

(सलीम दलवाईचे घर. तो आतल्या खोलीत. बाहेरून अम्मी त्याला हाक मारत आहे. अब्बाही तिथंच)

अम्मी : सलीमऽऽऽ ओ बेटा सलीम! (अब्बाना) सुनो तो–

अब्बा : क्या हुवा?

अम्मी : सलीम तैयार नही हुवा अभितक, जरा देखो तो...

अब्बा : क्या देखू? अभी बच्चा है क्या वो? देर रात तक पढाई कर रहा था...

अम्मी : मुझे मालूम है.

अब्बा : क्या?

अम्मी : छोटे मिया तो छोटे मिया, बडे मिया सुभानल्ला (पुन्हा हाक मारते ) सलीम ओऽऽऽ सलीम!

अब्बा : क्यू पिछे पडी है उसके? आयेगा...

अम्मी : आपके भरोसे छोड दिया उसे आज तक...

अब्बा : तो क्या हुवा?

अम्मी : दुसरा क्या होगा? घर मे बैठे बैठे पागल हो जायेगा...

अब्बा : मेरे जैसा? (मोठयानं हसतात.

सलीम : (आतूनच ) आलो, आलो...

(सलीम बुटांचा जोड हातात घेऊन बाहेर येतो आणि खुर्चीवर बसून बूट घालू लागतो)

अम्मी : इंटर्व्ह्यू जाने का इरादा नही क्या बेटे?

सलीम : नही तो फिर ये तैयारी किस लिए कर रहा हूं ? कॉल आल्यापासून रोज चाललं होतं तुझं तैयारी कर - तैयारी कर...

अम्मी : तो हो गयी ना सब तैयारी?

सलीम : हो गयी.. पुरी कोशीश करी है मैने, फिरभी अपना-अपना नसीब...

अब्बा : तकदीर की बात क्यू करता है? तू जहा लात मारेगा वहा पानी निकाल सकता है.

सलीम : पानी निकालना आसान है मगर सरकार की नौकरी हासील करना उतनाही मुष्कील है अब्बा...

अब्बा : ऐसा मत सोच बेटे. डबल ग्रॅज्युएट है तू. एनसीसी का सिनिअर अंडर अफसर का सर्टिफिकेट है तेरे पास...

सलीम : त्याचंच जास्त वाईट वाटतं. मागं सबइन्स्पेक्टरच्या भरतीच्या वेळी काय झालं? परीक्षा दिली, फिजिकल टेस्ट झाली, चांगला इंटर्व्ह्यू झाला, क्या हुवा आगे? सगळे वशिल्याचे लोकच गेले ना पुढे? ( अम्मी - आबा दोघेही ही निरुत्तर होतात. राग उपसल्याप्रमाणे) मुसलमान म्हणजे या देशाचे शत्रू आहेत असं वाटतं सगळ्यांना...

अब्बा : (संतापून) ऐसा मत बोल बेटे, खुदा के वास्ते! इन्कलाबियोंका खानदान है हमारा ... मुरुड मे हार्डवेअर की दुकान मे बैठकर तेरे अब्बाजान चुपकेसे बम और पिस्तुल बनाते थे... ताम्रपत्र दिया है गव्हर्नमेंटने... किसलिये? उन्होने ऐसी बाते कभी मन मे भी नही लायी. शादी के बाद भी बहु को स्कूल भेजनेवाला दुसरा मुसलमान है क्या अपने यंहा?

सलीम : मैने, ना कब कहा? फक्त माझ्यात काय कमी आहे तेवढं सांगा तुम्ही ! तीन बार मैने एम्पीएस्सी की परीक्षा पास कियी है, फिर भी नौकरी क्यू नही मिलती? मुसलमान हूं इसीलिए ना?

अब्बा : ऐसी बात मत कर बेटे. ये मुल्क हमारा है, हिन्दुस्तानी है हम. हमारे रग रग मे जो खून दौड़ रहा है वो हिन्दुस्तानी खून है !

सलीम : (उपरोधाने टाळ्या वाजवत)

सारे जंहा से अच्छा... हिंदोस्ता हमारा!

हम बुलबुले हे उसकी ये गुलिस्तां हमारा...

अब्बा : मजाक मत कर बेटे, और सून, ऐसे वैसे जवाब मत देना उधर, तुम्हे मेरी कसम! मेरी जिन्दगीकी एक ही तमन्ना बाकी है–

सलीम : की मै सरकारी नौकरी करु...

अब्बा : बिलकुल! अगर इस बार चान्स नही मिला तो एज बार हो जाएगा तू. फिर सरकार मे नौकरी की कोई गुंजाईश नही रहेगी.

सलीम : (आनंदाने) फिर मेरा दुबईका पक्का!

अब्बा : (चिडत) तेरा एक भाई जो है उधर... और क्या रक्खा है दुबईमे? (त्राग्यानं) बेटा उधर, माँ-बाप इधर. चार चार साल एक दुसरे को देख नही सकते. क्या जिन्दगी है बता?

सलीम : नाहीतर मग मुरुडला जाऊन आपल्या हार्डवेअरच्या दुकानात बसत जाईन... अगदी खरं बोलायचं तर असल्या माणसांपेक्षा मला हार्डवेअरच्या दुकानातले डबे, बाटल्या, खिळे, लोखंडाच्या साखळ्या, शिगा हे निर्जीव सामान जास्त जवळचं वाटतं अब्बा!

अब्बा : इतनी पढाई-लिखाई करनेके बाद भी हार्डवेअर की दुकान मे बैठेगा? नही बेटे नही... मै तुझ सरकारी अफसर बना हुवा देखना चाहता हूं...

सलीम : (हसत) ओके, फिकर मत करना.सगळा अभ्यास नीट केलाय मी. माझा इंटव्ह्यू चांगला होईल याची गॅरॅन्टी देतो.

अब्बा : बहोत खूब!

सलीम : मगर सिलेक्शन होगा के नही मै नही बता सकता...

अम्मी : वो काम तू अल्लापे छोड दे. अल्ला मालिक है, सब ठीक हो जायेगा. (सलीम दोघांच्याही पाया पडून बॅग घेऊन बाहेर पडतो. त्याचवेळी मागे 'अल्ला हो अकबर' असा अजानचा आवाज येऊ लागतो. अब्बा, अम्मी दोघेही नमाज पढू लागतात. हळू हळू अंधार)

अंक पहिला / प्रवेश चौथा

(मंत्रालयातील चौथ्या माळ्यावरची चारशे एकोणीस क्रमांकाची खोली. म्हणजेच सामाजिक न्याय विभागाचे सहसचिव श्री. ताम्हणकर यांचे कार्यालय. रंगमंचाचे दोन भाग. एका भागात ताम्हणकरांचे दालन तर दुसऱ्या भागात त्यांच्या स्टाफची तसेच अभ्यागतांची बसण्याची जागा. मधोमध एक अदृश्य दरवाजा. तो ढकलून आत-बाहेर जाता येतं. दोन्ही भागातले प्रसंग प्रेक्षकांना एकाच वेळी दिसू शकतात. ताम्हणकरांची 'रिव्हाल्विंग चेअर' दिसते. समोर मोठे टेबल, चार-सहा खुर्च्या. बाजूला भिंतीला पाठ टेकून दोन खुर्च्या. टीपॉय. भिंतीवर कॅलेंडर. घड्याळ. एकीकडे गोदरेजचे छोटे कपाट. बाहेर स्टेनो श्रीमती राणे यांची खुर्ची-टेबल. टेबलावर कॉम्प्युटर. बाजूला सोफा, मधेमध मोठा टीपॉय. त्यावर काही अंक, वर्तमानपत्रं. मधल्या दरवाजाजवळ शिपायासाठी स्टूल. एका कोपऱ्यात पाण्याचा छोटा फिल्टर, ग्लास.  राणेबाईंच्या टेबलावर मुख्य फोन. त्याचे एक्स्टेंशन ताम्हणकर साहेबांच्या टेबलावर. प्रकाश येतो. घोले शिपाई साफसूफ करत आहे. फोन वाजतो.)

घोले : (फोन उचलून) हॅलो ऽऽऽ नमस्कार... कोन पायजे? सायेब आजून आयले नायत, थोऱ्या टायमानी फोन करा... ऑ? (थोडं चिडत) सायेब लोक येण्याचा टाईम ठरलेला असतो का कधी ? मी ? मी त्यांचा शिपाई बोलतोय... घोले... एम. के. घोले... महम्मद उसमान महम्मद कासम घोले... घो... ले... घो... घो... कोकणात 'आयचा घो' असतो ना त्यातला 'घो' कल्ला? (फोन ठेवतो. काम करु लागतो. पुन्हा फोन वाजतो) हॅलोऽऽऽ नमस्कार. कोन बोलतंय ? हां... हां... बराबर, बराबर ... इन्टर्वि हतंच होनार हायेत... सायेब? सायबांचा काय खरा नाय. आले तर येतीलबी एवऱ्यात. तुमी ऐसा करा; सायबांच्या पी. ए. राणेबाई येतील आता, थोऱ्या टायमानी फोन करा... तुमचा इन्टर्वि हाय का? कल्ला - कल्ला.. अँड्रेस सांगू? हां, घ्या लिहून... शॉर्टकट हाय... मंत्रालयात जे जे गेटनी आत शिरायचा, पोष्टाजवळच्या लिफ्टनी पाचव्या माल्यावर पोचायचा. थवरसून मेन बिल्डिंगीमधी येऊन एक मजला खाली उतरायचा, मंग ब्रिजवरनं डाव्या हाताला हे असं वल्लाव की कुनालाबी कमिटी रुम इंचारायची. त्याच्या बाजूला चारशे एकोनीस नंबरची खोली हाय. तेच ताम्हणकर सायबांचं हापीस... कल्ला? आता दिमाग चाटू नका, चारशे वीस नंबरची खोली का नाय ते तुम्ही साहेबानाच इचारा! (फोन आपटत) चॅयला, ह्या इन्टर्विवाल्यांनी जीव नकोसा केलाय. (राणेबाई येतात) आगदी देवासारख्या आल्याव बाई...

राणे : (हसत) का रे?

घोले : काय तोंडाला येईल ते इचारतात लोक फोनवर...

राणे :  (हसत) ते मस्टर घे इकडं!

घोले : घ्या! (देतो)

राणे : (स्वतः सही करत) सही केलीस तू?

घोले : पंधरा वर्षात एक दिवस विसरलो नाय मॅडम!

राणे : हो... बरोबर! तू असं कर...

घोले : काय?

राणे : (पर्समधून पैसे काढून देत) माझ्यासाठी एक कॉफी घेऊन ये!

घोले : आनतो मॅडम! (पैसे घेऊन जातो. फोन वाजतो)

राणे : (फोन उचलत) हॅलोऽऽऽ हां... हां... कोण बोलतंय? हो... हो... नमस्कार! साहेब आले नाहीत अजून मी त्यांची स्टेनो राणे बोलतेय. देते निरोप साहेबांना... येतीलच आता... काय नाव म्हणालात कँडिडेटचं? (लिहून घेत) जयसिंग माने? हं... हं... ओ. के. ओ. के.... वेलकम सर! ( फोन ठेवतात. पर्समधला आरसा काढून ओठावरून लिपस्टिक फिरवतात. गुणगुणत पेपर उचलून चाळू लागतात. इतक्यात पुन्हा फोन वाजतो. त्या उचलतात...) हॅलोऽऽऽ हां... हां... बरोबर, कोण बोलतंय आपण? नमस्ते सर! मी मिसेस राणे बोलतेय, साहेबांची स्टेनो... साहेब आले नाहीत अजून पण येतीलच इतक्यात... काही निरोप होता का? येस सर, बरोबर सर– कम्युनिकेशन ऑफिसर... इथेच सुरु आहेत इंटर्व्ह्यू. आजचा शेवटचा दिवस आहे सर. फक्त चार-पाच कँडिडेट उरलेत सर... पॅनलवर? आमचे ताम्हणकरसाहेब चेअरमन आहेत, सेवा विभागाचे पुराणिक आणि वित्तचे लोखंडे मेंबर आहेत सर... ( घोले कॉफी घेऊन येतो. बाईंच्या टेबलावर ठेवतो) मी निरोप देते सर आपला, थँक्यू सर! ( फोन ठेवून कॉफी घेऊ लागतात. घोले एक पेपर घेऊन आपल्या स्टुलावर जाऊन वाचत बसतो.)

सलीम : (दारातूनच) मे आय कम इन मॅडम?

राणे : या या... इंटर्व्ह्यूसाठी आले असाल ना? काय नाव तुमचं?

सलीम : सलीम दलवाई.

राणे : बसा तिकडं. मी जरा एवढी कॉफी संपवते. ओरिजिनल सर्टिफिकेट्स आणलेयत ना सर्व?

सलीम : हो मॅडम!

राणे : बसा!

सलीम : हो मॅडम.

घोले : (मध्येच चौकशा करत सलीमला) दलवाई म्हजे गाव कंचं तुमचं?

सलीम : तसे आता आम्ही मुंबईकर झालोय, पण मूळ गाव मुरुड.

घोले : काय बोलताव काय?

सलीम : हो, का बरं?

घोले : मी पन मुरुडचा! मुरुडला कुठं ऱ्हाताव?

सलीम : पापामिया लोखंडवाले माहितायत का तुला?

घोले : त्ये लोखंडी सामानाचं दुकान हाय ते, बाजारपेठेतलं?

सलीम : हां त्येच...

घोले : त्याना सगला रायगड जिल्हा वलाखतो. सोतंत्र्यसैनिक व्हते त्ये. त्यांचा मुलगा म्हम्मद माज्या वर्गात व्हता.

सलीम : त्या म्हम्मदचा मी मुलगा.

घोले : काय बोलतोस काय?

सलीम : हो ना!

घोले : मंग आगदी एकाच घरातलेच निघालो आपन...

सलीम : बरं झालं तुमची ओळख झाली.

घोले : मंत्रालयात आनि सरकारी हास्पिटलमधी वलख निघायला तकदीर पायजे... काय? (हसतो)

('बरोबर, बरोबर ' असं म्हणत सलीम सोफ्यावर बसतो. ऑफीस न्याहाळू लागतो तोवर संपदा आणि प्रशांत एका मागोगाम येतात )

संपदा : मे आय कम् इन मॅडम?

राणे : येस... या... या... बसा तिकडं सोफ्यावर काय नाव तुमचं?

संपदा : संपदा कर्णिक.

प्रशांत : में आय कम् इन मॅडम?

राणे : येस येस... प्लीज कमिन्. इंटर्व्ह्यूसाठी आलात ना?

प्रशांत : हो मॅडम.

राणे : बसा तिकडं सर्वांनी आणि आपापली ओरिजिनल सर्टिफिकेट्स काढून ठेवा ! (प्रशांतला) तुमचं नाव काय ?

प्रशांत : प्रशांत उपाध्ये.

राणे : ओ.के., बसा. (हाक मारत) घोले ऽऽऽ

घोले : जी बाईसाब...

राणे : बाहेर चहाची गाडी असेल. ह्या सर्वांना चहा आणून दे आणि बाहेर आणखी कोणी कँडिडेट आहे का बघून ये!

घोले : (बाहेर जात) जी बाईसाब...

(राणेबाई आपली कॉफी घेता घेता एक फाईल समोर ओढतात आणि एकेका नावावर खूण करत एकेकाला बोलावून त्याची सर्टिफिकेट्स चेक करतात)

राणे : सलीम दलवाई...

सलीम : येस मॅडम (फाईल दाखवून परत जागेवर जाऊन बसतो)

राणे : संपदा कर्णिक...

संपदा : हो... आले मॅडम (फाईल दाखवून पुन्हा जागेवर )

राणे : प्रशांत उपाध्ये...

प्रशांत : येस मॅडम... (फाईल दाखवून पुन्हा जागेवर बसतो. घोले ग्लासातून चहा घेऊन येतो. तिघांनाही देतो आणि आपल्या जागेवर जाऊन पेपर वाचत बसतो...)

राणे : (हाक मारत) घोलेऽऽऽ

घोले : जी बाईसाब–

राणे : हे पैसे घे चहाचे ... मी दोन मिन्टात लोखंडे आणि पुराणिक साहेबांना निरोप देऊन येते. फोनवर लक्ष ठेव इथं!

घोले : जी बाईसाब...

( राणे बाई निघून जातात. घोले पेपर वाचत बसतो. या तिघांचं आपापसात बोलणं सुरू होतं.)

सलीम : (प्रशांतला ) कुठून आलास तू ?

प्रशांत : मी डोंबिवलीला रहातो, प्रशांत उपाध्ये. तू ?

सलीम : भायखळ्याला ! सलीम दलवाई. (संपदाला) आपण?

संपदा : मी कल्याणला राहाते. संपदा कर्णिक. (सर्वांचे हाय हॅलो.) फार टेन्शन आलंय हो...

सलीम : यापूर्वी किती इंटर्व्ह्यू झाले तुझे?

संपदा : हा पहिलाच...

सलीम : त्यामुळंच!

संपदा : (सलीमला) तुझे किती झाले?

सलीम : एम् पी एस्सीला तीनदा पास झालो. पण इंटर्व्ह्यूमध्ये फेल ! आसमान से गिरा और खजूरपे अटका ... (हसतो) अभी आखरी चान्स है.

प्रशांत : म्हणजे?

सलीम : अगर इसबार फेल हो गया तो एज बार हो जाऊंगा मै. सरकारी नोकरीचे दरवाजे कायमचे बंद!

संपदा : एकूण पाच पदं भरायचीत ना? कितीजणांना बोलावलंय?

प्रशांत : नक्की काही कल्पना नाही. (घोलेला) अहो ऽऽऽ (टाळ्या वाजवत) शुक् शुक्...

घोले : ( पेपरमधून मान बाहेर काढत) मला काय बोल्लाव?

प्रशांत : हो...

घोले : काय?

प्रशांत : ह्या पाच पदांसाठी कितीजणांना बोलवलंय?

घोले : (तपशीलवार माहिती देऊ लागतो) त्याचा झैला काय, परिक्षेला चार हजार पोरं बैसली. त्यातली आरीचशे पास झैली, पन फकस्त पन्नासजणांना इन्टर्विला कॉल पाठवलाय कल्ला काय?

संपदा : (हसत) हो, हो समजलं!

घोले : (मोठ्याने पेपर वाचतो) ऐश्वर्या रायच्या घरासमोर सलमानखानचा तमाशा! (सर्व हसतात. राणे लगबगीने आत येत घोलेला) "अरे, साहेब आले, पळ" असे म्हणतात. घोले बाहेर जातो. ब्रिफकेस हातात घेऊन धावतच पुढे येतो. त्याच्या मागोमाग ताम्हणकर. ते डायरेक्ट आत जातात. आत जाताना राणेबाई त्यांना "गूड मॉर्निंग"

करतात. ते ही "मॉर्निंग" असे पुटपुटत ह्या तिघांकडे नजर टाकून आत जातात. घोले ब्रिफकेस टेबलावर ठेवतो.)
ताम्हणकर : राणेबाईंना पाठव !

घोले : जी साहेब... ( बाहेर येतो. राणेबाई डिक्टेशन पॅड घेऊन आत जातात.)

ताम्हणकर : बसा...

राणे : (बसतात)

ताम्हणकर : बोला, काय काय आहे आज?

राणे : इंटर्व्ह्यू संपले की दुपारी वित्त विभागात पूरक मागण्यांसंबंधी बैठक आहे. ती झाली की संध्याकाळी यशवंतराव चव्हाणमध्ये अहिल्याबाई होळकर पुरस्कारांचा कार्यक्रम आहे.

ताम्हणकर : कितीजण आहेत इंटव्ह्यूसाठी?

राणे : तिघे आलेत. अजून एक बाकी आहे.

ताम्हणकर : ओ. के. पुराणिक आणि लोखंडे साहेब आले का?

राणे : येतीलच आता ! आत्ताच सांगून आले मी त्यांच्या ऑफीसमध्ये...

ताम्हणकर : व्हेरी गूड. काही निरोप वगैरे?

राणे : रविदास पाटील साहेबांचा निरोप होता.

(चिठ्ठी देत) हे नाव दिलंय. जयसिंग माने. एवढं काम करा म्हणाले. पुन्हा फोन करणार आहेत.

ताम्हणकर : बोलले ते रात्री माझ्याशी. आणखी?

राणे : एसीएस साहेबांचा फोन होता. नंतर करतो म्हणाले.

ताम्हणकर : ओ.के.

(बाहेरुन पुराणिक, लोखंडे फायली घेऊन येतात. राणेबाई उठून बाहेर जातात)

पुराणिक : ( येता येता) काय येऊ का साहेब?

ताम्हणकर : या या (लोखंडेकडे पहात) या लोखंडेजी या, बसा... (ते दोघेही बसतात. घोले चहाचा ट्रे आतमध्ये घेऊन येतो आणि सर्वांना चहा देतो. दरम्यान त्यांच्या गप्पा सुरु.)

पुराणिक : कितीजण उरलेत अजून?

ताम्हणकर : जास्त नाहीत तीन-चारजण आहेत. कंटाळा आला अगदी...

लोखंडे : वुई आर 'पेड' फॉर दॅट (हसतात. हे दोघेही त्यांच्या हसण्यात सहभागी होतात)

पुराणिक : ओव्हरऑल दर्जा चांगला आहे पण मुलांचा ..

लोखंडे : किती सिन्सिअली अभ्यास करतात ना? त्यांची धडपड पाहून वाईट वाटतं कधी कधी... कुठं चाललाय आपला देश असं वाटतं.

पुराणिक : देशाची काय काळजी करताय? आपण कुठं जायचं तेवढं ठरवा म्हणजे झालं... (पुन्हा तिघेही हसतात). (ताम्हणकरांना) बाकी काय विशेष?

ताम्हणकर : काही खास नाही. तुमची प्रमोशनची ऑर्डर केव्हा निघतेय?

पुराणिक : बघू आता... सामान्य प्रशासन विभागात पडलेय फाईल ... पिंगळे साहेब वाचताहेत.

लोखंडे : (मोठयानं हसत) काय सांगताय? मंत्री फाईल वाचताहेत? (सर्व पुन्हा हसतात)

पुराणिक : जायस्वाल साहेबांचा फोन आला होता घरी.

ताम्हणकर : कशाला?

पुराणिक : त्यांचा कोणीतरी कँडिडेट आहे म्हणे... ताम्हणकरसाहेबांना सांगा म्हणाले...

ताम्हणकर : माझ्याकडं कितीजणांचे फोन आणि चिठ्या आल्या लक्षातच नाही... त्या निमित्तानं का होईना लोकांचं आपल्याशी 'कम्युनिकेशन' होतं (सर्व हसतात) काय? चला, सुरू करू या का आता?

लोखंडे : हो हो...

(ताम्हणकर बेल दाबून घोलेला बोलावतात आणि प्रशांत उपाध्येचे नाव सांगतात. तो बाहेर येऊन नाव घोषित करतो) प्रशांत उपाध्येऽऽऽ प्रशांत : ( बॅग उचलून आत जात ) मे आय कम इन सर ?

ताम्हणकर : येस कमिन, प्लीज सीट डाऊन...

प्रशांत : थँक्यू सर ! (बॅगेतली फाईल काढून हातात देतो)

पुराणिक : (फाईल चाळत) किती शिक्षण झालं तुमचं?

प्रशांत : सायकॉलॉजीमध्ये एम. ए. केलं आणि नंतर बी. जे. - बॅचलर ऑफ जर्नालिझम... दोन्हीमध्ये फर्स्टक्लास आहे साहेब.

पुराणिक : व्हेरी गूड... व्हेरी गूड...

लोखंडे : तुम्ही खरं म्हणजे प्राध्यापक व्हायला हवं होतं...

प्रशांत : (ओशाळत) प्रयत्न केला साहेब पण जमलं नाही. आता एम् फिल कंपलसरी केलंय...

ताम्हणकर : मग करून टाकायचं की, आहे काय त्यात?

प्रशांत : एवढ्यात जमणार नाही साहेब, घरची जबाबदारी आहे. वडील नाहीत. आई आणि विधवा बहिणीकडं पाहावं लागतं...

( बाहेर फोन वाजतो राणेबाईंकडे फोन घेऊन आत साहेबांच्या एक्स्टेन्शनला रिंग देतात)

ताम्हणकर : (फोन उचलून) कोण बोलतंय?

राणे : विधान-भवनातनं साळवीसाहेबांचा फोन आहे...

ताम्हणकर : हं. द्या! ( राणेबाई फोन ठेवतात) हॅलोऽऽऽ, नमस्कार साळवीसाहेब, काय म्हणता, काय विशेष? सरकार कसं चाललंय? सरकार चालवणारे आम्ही कोण? ते तर तुम्ही चालवता. आम्ही फक्त तुमच्या आदेशांचं

पालन करतो. (मोठ्याने हसतात) बोला, काय म्हणता? ओ आय सी... आय सी... बरोबर... बरोबर... आलं लक्षात. काय नाव म्हणालात? एक मिनीट हं, लिहून घेतो. (लोखंडे - पुराणिकांकडे सूचकपणे पहात नाव लिहून घेतात) हां... हां... बघतो... बघतो... ओ के... थँक्यू! ( फोन ठेवतात. क्षणभर शांतता. पुढचा प्रश्न विचारतात ) सायकॉलॉजीमध्ये एम्. ए. केलं ना तुम्ही?

प्रशांत : येस सर...

ताम्हणकर : मग सांगा आई आणि मुलगा यांच्यातील सूप्त लैंगिक नात्याचा सिद्धांत कोणी मांडला?

प्रशांत : सिद्धांत नाही. फ्रॉईडचं मत आहे तसं. आणि ते मत म्हणजे त्याच्या संशोधनाचा सारांश नाही हे लक्षात घेतलं पाहिजे. आई आणि मुलाच्या नात्याकडे पहाण्याचा एक निर्मळ दृष्टीकोन आहे तो.

पुराणिक : वा, वा ! व्हेरी गूड...

लोखंडे : कम्युनिकेशन ऑफिसर व्हावं असं तुम्हाला का वाटतं?

प्रशांत : लोकांची सेवा करायला मिळेल.

लोखंडे : ते कसं काय?

प्रशांत : दलितांसाठी राबविल्या जाणाऱ्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवणं हे या पदाचं मुख्य काम आहे. स्वातंत्र्य मिळून इतकी वर्ष झाली पण दलित समाजाचा म्हणावा तसा विकास झालेला नाही. त्यासाठी त्यांच्या योजना त्यांच्यापर्यंत प्रभावीपणं पोहोचण्याची गरज आहे. ते काम करायला आवडेल मला.

पुराणिक : पण पेपरवाले आमच्या बातम्या छापत नाहीत...

प्रशांत : बातम्यांची क्वालिटी जर चांगली ठेवली तर नक्कीच छापतील सर्वजण. त्यांनाही मजकुराची गरज असतेच की.

लोखंडे : व्हेरी गूड, व्हेरी गूड!

ताम्हणकर : पृथ्वीपासून अवकाशयानानं चंद्रावर जायला किती वेळ लागतो सांगा...

प्रशांत : (चुळबुळत) सॉरी... त्याची काही कल्पना नाही साहेब...

लोखंडे : मध्यरात्रीच्या अंधारात शंभर वॅटच्या विजेरीचा झोत एक मि.मी. जाडीच्या पारदर्शक काचेवर टाकला तर तो प्रकाश त्या काचेतून पलिकडं जायला किती सेकंद लागतील? (तो गोंधळतो. काही क्षण शांतता)

पुराणिक : समाजातील वाढता भ्रष्टाचार रोखण्यासाठी काय करावं लागेल असं वाटतं तुम्हाला?

प्रशांत : (उत्साहानं ) 'चॅरिटी बिगिन्स ॲट होम' असं म्हटलं जातं, त्यामुळं समाजातला भ्रष्टाचार रोखायचा तर त्याची सुरुवात प्रत्येकानं स्वतःपासूनच केली पाहिजे. कितीही संकटं आली, कसोटीचे क्षण आले तरी भ्रष्टाचाराला बळी पडायचं नाही असा निर्धार प्रत्येकानं केला पाहिजे. आज अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकी माणसं भ्रष्टाचाराच्या विरोधात बोलताना दिसत असली तरी तेवढाही विरोध फार महत्वाचा आहे हे लक्षात घेतलं पाहिजे आपण, नाहीतर भ्रष्टाचार हीच योग्य जीवनपध्दती आहे असं मानायला लागतील लोक. सुदैवाने लाचलुचपत आणि भ्रष्टाचार संपवण्यासाठी शासन अनेक योजना आखत असतं त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणं महत्त्वाचं! आपण साऱ्यांनी संपूर्ण ताकदीनिशी प्रमाणिकपणाचं मोल टिकवत जगत रहाणं हेच भ्रष्टाचाराला खरं उत्तर ठरेल.

(प्रशांत स्वत:त हरवलेला. इतर किंचित भारावलेले. प्रशांतला त्याचेच पुढील शब्द क्षणभर ऐकू येतात.)

रोज लढाई जगण्यासाठी, रोज नवे आव्हान

झुंजायाची भीती न जेथे तुझे असे वरदान

रात दिवस काही न पाहता मेहेनत मी करणार तुझ्या अपेक्षा समोर ठेवून जीवन घडवणार

बा आदब, वा मुलाहिजा, होशियाऽऽऽर

ही नोकरी आहे माझ्यासाठी, मलाच ती मिळणार!

ताम्हणकर : ठीक आहे... या तुम्ही!

प्रशांत : (उठत) थँक्यू सर!

(सर्वांना अभिवादन करुन बाहेर निघून जातो. ताम्हणकर बेल वाजवतात. घोले आत येतो. त्याला 'संपदा कर्णिक' असे नाव सांगतात. तो बाहेर येऊन नाव जाहीर करतो. ती कागदपत्रं घेऊन आत येते.)

संपदा : मे आय कमिन सर?

ताम्हणकर : येस प्लीज... बी सीटेड!

संपदा : थँक्यू सर!

ताम्हणकर : किती शिकलात तुम्ही?

संपदा : बॅचलर ऑफ कम्युनिकेशन सायन्स आणि डिप्लोमा इन जर्न्यालिझम.

पुराणिक : व्हॉट इज द डेफिनेशन ऑफ कम्युनिकेशन?

संपदा : एनीथिंग अंडर द सन, विच कॅन बी कम्युनिकेटेड डायरेक्टली ऑर इन्डायरेक्टली, विथ द व्ह्यू टू एक्स्प्रेस द फिलिंग्ज् और इन्फॉर्म दि डिझायर्ड मोटिव्ह बाय वे ऑफ वर्डस्, इमेजेस, गेच्छर्स एट्सेट्रा ...

(बाहेर फोन वाजतो. राणेबाई उचलतात)

राणे : हॅलो... हं... कोण बोलतंय? हो हो. एक मिनीट हं (आत रिंग देतात. ताम्हणकर उचलतात)

ताम्हणकर : हॅलोऽऽऽ

राणे : सर नलिनी मॅडम बोलताहेत.

ताम्हणकर : (चेहेऱ्यावर आनंद) द्या... द्या... (राणेबाई फोन ठेवतात) हं. बोला... काय म्हणता, मजेत? कसा झाला दिल्ली दौरा? गूड - गूड... मी मजेत आहे... दुसरं काय करणार? तुमची वाट बघतोय... (हसतात) ओके... ओके... या ना... या की... अगदी... साडेसात आठपर्यंत नेहमीच असतो मी ऑफीसात... बरोबरच जाऊ मग बाहेर... ओ के? थँक्यू... (फोन ठेवत संपदाला ) कुठं रहाता आपण?

संपदा : कल्याणला!

लोखंडे : (निरखून पहात) आमच्याकडं उशिरापर्यंत काम करावं लागतं, त्याला तयारी आहे तुमची?

संपदा : आवश्यकता असेल तर थांबायला काहीच हरकत नाही.

लोखंडे : बजेट असतं तेव्हा रात्र रात्र थांबावं लागतं...

संपदा : अनेकजणी थांबत असतील, त्यांच्याप्रमाणे मीही थांबू शकेन!

ताम्हणकर : व्हेरी गूड. साडेपाचनंतर जरा थांबायला सांगितलं तर लगेच कांगावा सुरू करतात आमच्या महिला कर्मचारी.

संपदा : (परखडपणे) रात्री उशिरापर्यंत थांबणं हा एकमेव क्रायटेरिया आहे का या पदाचा?

ताम्हणकर : (चमकत) नाही तसं नाही. ऑन द कॉन्ट्ररी आय ॲम ट्राईंग टू ॲडमिट यूवर स्पिरीट... महिला आणि पुरुष असा भेद करायचे दिवस राहिले नाहीत आता. (लोखंडेना) विचारा तुम्ही...

लोखंडे : रोजगार हमी योजनेतील मजुरांना दररोज सत्तर रुपये मजुरी दिली जाते. त्यांच्या आहारात किती कॅलरिज् गृहीत धरुन हा दर ठरवण्यात आला आहे?

संपदा : (गोंधळून) मला काही सांगता येणार नाही त्याविषयी.

पुराणिक : ओ. के. इंटरनेटवरील अश्लील साहित्याचा प्रसार रोखण्यासाठी काय उपाय सुचवाल तुम्ही?

संपदा : त्यावरचा सर्वात प्रभावी उपाय म्हणजे त्याची चर्चा आपण आधी थांबवली पाहिजे!

पुराणिक : म्हणजे, नेमकं काय म्हणायचंय तुम्हाला?

संपदा : जीवनात चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही गोष्टींचं मिश्रण असतं. आपण कोणत्या रस्त्याला लागायचं ते आपल्या हातात असतं. इंटरनेटच्या रुपानं सगळं जग आपल्या जवळ आलंय. ज्ञानाचं प्रचंड भांडार खुलं झालंय. त्या ज्ञानाचा फायदा घ्यायचा की अश्लील साहित्याची काळजी करत बसायचं हे आपणच ठरवायला हवं.

लोखंडे : पण हे साहित्य सहजगत्या आणि मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्यामुळं तरुण पिढी आणि लहान मुलांच्या मनावर दुष्परिणाम होतोय असं नाही वाटत तुम्हाला?

संपदा : इंटरनेट नव्हतं तेव्हाही जगात अश्लील साहित्य होतंच की ! मग आपण आताच इतकी काळजी का करायची?

पुराणिक : राईट.

लोखंडे : तुम्हाला स्वतःला काही सांगायचं असलं तर सांगा.

संपदा : कम्युनिकेशन ऑफीसरचं काम मुख्यतः प्रसिद्धी माध्यमांशी आणि लोकाशी संपर्क ठेवण्याचं आहे. त्याचं शास्त्रशुद्ध शिक्षण घेतलंय मी. या कामाला मी पूर्णपणे न्याय देऊ शकेन एवढं नक्की ! एक प्रामाणिक, चारित्र्यसंपन्न आणि निष्ठावान अधिकारी म्हणून नाव मिळवू शकेन मी याची मला खात्री आहे.

ताम्हणकर : ओ के, थँक्यू. या आपण!

संपदा : (उठत) थँक्यू!

(ताम्हणकर बेल बाजवतात. घोले येतो. त्याला सलीम दलवाईचे नाव सांगतात. तो बाहेर येऊन 'सलीम दलवाई' असे घोषित करतो. त्याबरोबर आपली कागदपत्रे घेऊन सलीम आत येतो)

सलीम : मे आय कमिन सर?

ताम्हणकर : येस, कम इन; सीट डाऊन!

ताम्हणकर : पाहू तुमची फाईल?

सलीम : (ताम्हणकरांच्या हातात फाईल देतो. ते ती चाळू लागतात) एन. सी. सी. मध्ये सिनिअर अंडर ऑफिसर होता तुम्ही?

सलीम : हो साहेब. 'प्राईम मिनिस्टर्स फ्लॅग' लागोपाठ तीन वर्ष आणला आम्ही महाराष्ट्रात. हे रेकॉर्ड देशातील दुसऱ्या कोणत्याही राज्यानं मोडलेलं नाही.

लोखंडे : व्हेरी गुड. पोलिसखात्यात भरती का नाही झालात तुम्ही?

सलीम : प्रयत्न केला साहेब पण शक्य नाही झालं?

पुराणिक : (खोचकपणे) काय प्रयत्न केला?

सलीम : बहोत लगनसे स्टडी कियी. तीन बार पास हो गया एमपीएस्सी मे... मगर इंटर्व्ह्यू मे फेल हो गया. इंटव्ह्यू अच्छा होने के बावजूद भी लक नेव्हर वाँटेड टू स्माईल ऑन मी...

ताम्हणकर : नशीबावर विश्वास आहे तुमचा?

सलीम : विश्वास आहे पण कर्तृत्व हे त्याहून मोठं मानतो मी.

पुराणिक : मराठी फार चांगलं बोलता तुम्ही...

सलीम : धन्यवाद साहेब!

लोखंडे : गाव कुठलं तुमचं?

सलीम : मुरुड. रायगड जिल्हयात आहे. आजुबाजूला मराठी कुटुंब. शाळाही मराठी. त्यामुळं मराठी चांगलं येतं. मारुतीस्तोत्र आणि रामरक्षा अजून तोंडपाठ आहे.

पुराणिक : मारुतीस्तोत्र म्हणून दाखवा बरं...

सलीम : (अस्खलित उच्चार करीत म्हणू लागतो)

भीमरूपी महारुद्रा, वज्रहनुमान मारुती

वनारी अंजनीसूता रामदूता प्रभंजना

महाबळी प्राणदाता, सकळां उठवी बळे सौख्यकारी दुःखहारी, दूत वैष्णव गायका दीननाथा हरीरूपा, सुंदरा जगदंतरा पातालदेवताहंता, भव्यसिंदूरलेपना

लोकनाथा जगन्नाथा, प्राणनाथा, पुरातना पुण्यवंता पुण्यशीला....

पुराणिक : (त्याला थांबवत ) ओ के... ओ के... घरी कोण कोण असतं?

सलीम : वडील, आई आणि मी. एक भाऊ दुबईला आहे आणि बहीण नांदेडला असते. मुरुडमे हमारी हार्डवेअर की दुकान है. थोडी खेती है. हमारे अब्बाजाने स्वातंत्र्य सैनिक थे. बम और पिस्तूल बनाने के जुर्म मे जेल जाना पाडा उनको...

(बाहेर फोन वाजतो. राणेबाई उचलतात.)

राणे : हॅलोऽऽऽ नमस्कार... कोण बोलतंय? एक मिनिट हं... (माऊथपिसवर हात ठेवून आत रिंग देतात.)

ताम्हणकर : (फोन उचलत) हॅलो, कोण बोलतंय? रविदास पाटील? हो, द्या! (राणेबाई देतात) हॅलो, नमस्ते सर ! हो, ताम्हणकर बोलतोय सर, हो बरोबर, बरोबर... आज संपतील सर... अजून नाही... नाही... बघावं लागेल सर... मला वाटतं आपण जरा ठोकळेसाहेबांकडे बोलून घेतलं तर बरं होईल... (हसत) आमची मदत आपल्याला नेहमीच असते सर. बरं सर, ओ. के. सर. (फोन ठेवत. सलीमला) शिक्षण किती झालं तुमचं?

सलीम : एम. कॉम. केलं. नंतर घरबसल्या काम हवं म्हणून कॉम्प्युटर अॅप्लिकेशनचा डिप्लोमा घेतला आणि मुक्त विद्यापीठाची कम्युनिकेशनची डीग्रीसुद्धा मिळवली.

पुराणिक : भारतीय मुसलमानांना स्वतंत्र मुस्लीम राष्ट्र हवं असं म्हटलं जातं... याबद्दल काय वाटतं आपल्याला ?

सलीम : चुकीचं आहे ते. कुछ ऑर्थोडॉक्स हिंदू वैसा अपप्रचार जानबुझके करते रहते है... आणि इथले मुसलमान काय बाहेरुन आलेले नाहीत हे आधी लक्षात घेतलं पाहिजे. आता आम्ही दलवाई म्हणजे पूर्वी कधीतरी दळवी असणार हे उघडच आहे की !

लोखंडे : भारतानं केलेल्या अणु चाचणीविषयी काय मत आहे तुमचं ?

सलीम : भारतीयांसाठी अभिमानाची बाब आहे ती. पण जगात खरी शांतता आणि सामंजस्य राखायचं असेल तर ते प्रेमाच्या आधारेच राखता येईल हे लक्षात घेतलं पाहिजे. महात्मा गांधी याच देशात जन्माला आले हे विसरता कामा नये आपण.

ताम्हणकर : थँक्यू... या तुम्ही!

सलीम : (उठत) आपली परवानगी असेल तर एक विचारतो.

ताम्हणकर : काय?

सलीम : या इंटव्ह्यूचा निकाल कधी लागेल?

ताम्हणकर : तसं काही निश्चित सांगता येत नाही पण लागेल लवकरच.

सलीम : सहा महिन्यानंतर एज बार होताय मी साहेब. म्हणून विचारलं...

लोखंडे : ठीक आहे, प्रतिक्षा करा... बघू या काय होतं ते!

सलीम : थँक्यू सर (म्हणत निघून बाहेर येतो)

(ताम्हणकर बेल वाजवून राणेबाईना आत बोलावतात. सलीम बाहेर येऊन संपदा - प्रशांतशी बोलू लागतो. आत रिझल्ट तयार करण्याचे काम सुरु होते.)

संपदा : (सलीमला) कसा काय झाला?

सलीम : काही खास नाही. कामाच्या स्वरुपाविषयी काही विचारलं नाही. इतरच थांतूर-मातूर माहिती विचारली. तुझा कसा झाला?

संपदा : (हसत) रात्री उशिरापर्यंत थांबायची तयारी आहे का, असं एकजण विचारत होता. मी थोडी चिडूनच बोलले...

प्रशांत : अशा वेळी चिडायचं नसतं. कँडिडेटची 'टेम्परामेंट टेस्ट' असते ती ! अरे पण त्यासाठी काही दुसरे प्रश्न नाहीत का ? (दोघेही गप्प. काही क्षणांनी) एनी वे, रिझल्ट कधी लागेल असं वाटतं?

सलीम : मी तर स्पष्टच विचारलं त्याना पण नेहमीचंच सरकारी उत्तर... बघू या, पाहू या... वाट पाहा...

प्रशांत : आपण कॉन्टॅक्टमधे राहू एकमेकांच्या. कुणाला काही समजलं तर सांगू एकमेकांना ! (घोलेला) अहोऽऽऽ शुक्... शुक्..

घोले : (पेपरमधून मान काढत ) मला काही म्हनालाव?

प्रशांत : हो.

घोले : काय?

प्रशांत : या इंटर्व्ह्यूचा निकाल कधी लागेल असं विचारायचं होतं...

घोले : ते मला कसा म्हायत? सायबाना इचारा.

प्रशांत : नाही पण म्हणजे पद्धत काय असते निकालाची, सहज आपलं विचारतोय...

घोले : मजी बगा, आता सायेब रिपोट तयार करनार मंग ती फाईल सायबांकरनं  सचिवांकरं, तिथनं प्रधान सचिवांकरं, त्यानंतर सेवा विभाग- वित्त विभाग- राज्यमंत्री - मुख्यमंत्री आणि परत आमच्या सायबांकरं आर्डरसाठी येणार...

संपदा : बाप रेऽऽऽ किती वेळ लागेल त्याला?

घोले : हितं कुनाला टायमाचा परलाय? मागच्या टायमाला ऐसाच झेला व्हतां.

सलीम : काय झालं होतं?

घोले : माज्या फुफीचा साला अब्दुल–

सलीम : त्याचं काय झालं?

घोले : इंडस्ट्री डिपार्टमेंटला शिपाय हाय आता.

सलीम : मग?

घोले : इंटर्वी झेल्यानंतर सारेतीन वर्षानी अपाईंट झाला.

सलीम : काय म्हणता काय?

घोले : दोनदा सरकार बदललं सारेतीन वर्षात. ह्याच्यावरनं वलखा रिजेट कवा लागनार त्ये.

संपदा : तुमच्या डिपार्टमेंटनं नागरिकांची सनद प्रसिद्ध केलेय इंटरनेटवर. त्यात दोन महिन्यात निकाल लागेल असं म्हटलंय...

घोले : काय ते तुमी सायबानाच इचारा.

सलीम : ओके, ठीक! कॅन्टीन कुठाय तुमची ती सांगता का जरा? (इतर दोघांना ) चहा घेऊ जाता जाता... (दोघेही होकार भरतात.)

घोले : (दाखवत) हिकरच्या जिन्यानी दोन माले खाली उतरा आनि मधला व्हरांडा पकडून सरल त्या टोकाला चालत जावा. थतंच हाय कॅन्टीन...

(ताम्हणकर टर्रऽऽऽकन बेल वाजवतात. घोले 'चला, इंटर्व्ह्यू झैले...' असं म्हणत आत पळतो. हे तिघेही मुख्य दारातून बाहेर पडणार इतक्यात नवीन कँडिडेट जयसिंग माने आत येतो. हातात मोबाईल, सोन्याची साखळी, ब्रिफकेस. त्याच्याकडे काही क्षण संशयाने पहात तिघे निघून जातात. माने आत येतो. राणेबाईंच्या टेबलाजवळ घुटमळत उभा. काही. क्षणांनी राणेबाई आतून बाहेर येतात)

माने : (राणेबाईंना) नमस्कार मॅडम!

राणे : नमस्कार!

माने : मी जयसिंग माने, इंटर्व्यूसाठी आलोय...

राणे : पण इंटव्ह्यूची वेळ तर संपली.

माने : आय ॲम सॉरी, थोडी अडचण झाली.

राणे : आता कोणतीही अडचण सांगून फायदा नाही, रिझल्टचं कामसुद्धा सुरू झालं. तुम्हाला इंटर्व्ह्यू देता येणार नाही...

(माने मोबाईलची बटणं दाबू लागतो)

राणे : काय करताय?

माने : फोन लावतोय!

राणे : कुणाला?

माने : डेप्युटी चिफ मिनिस्टरना लावतोय.

राणे : (आल्या पावली पुन्हा साहेबांच्या केबीनमध्ये जातात आणि-) सर बाहेर जयसिंग माने नावाचा कँडिडेट आलाय. नियमाप्रमाणं वेळ संपली असं सांगितलं तरी ऐकत नाही. मोबाईलवरनं डीसीएम साहेबांना फोन लावतोय आता...

ताम्हणकर : ( पुराणिक - लोखंडेना) काय करायचं? याच्यासाठीच रात्री फोन होता रविदास पाटीलसाहेबांचा!

पुराणिक : तुम्ही डिसीजन घ्या. (लोखंडेना) काय?

लोखंडे : हो बरोबर. खरं म्हणजे नियमाप्रमाणे आता इंटर्व्यूची वेळ संपलेली आहे पण पॅनलचे अध्यक्ष म्हणून तुम्ही ठरवा काय ते!

ताम्हणकर : आघाडीचं सरकार आहे हे, शिवाय लोकशाही आहे आपल्याकडं... ऐकावंच लागतं सर्वांचं (राणेंना) आणि यू नो मुख्यमंत्रीपदाचे दावेदार आहेत पाटीलसाहेब. पुढं माग मुख्यमंत्री झाले तर पहिली लाथ बसायची यला... पाठवा त्याला !

राणे : (बाहेर येत मानेला ) जा, बोलवलंय साहेबांनी तुम्हाला आत.

माने : (ब्रिफकेससहीत हात वर उचलून नमस्कार करीत) थँक्यू... पण माझी सर्टिफिकेट्स तपासायची–

राणे : काही गरज नाही त्याची, जा तुम्ही!

माने : (पुन्हा थँक्यू म्हणत हसत हसत आत जात) मे आय कमिन सर?

ताम्हणकर  : येस् - येस्! कम इन्... बसा...

माने : (बसत) आय ॲम सॉरी पण मला जरा उशीर झाला... मी खरं म्हणजे मुक्कामालाच येणार होतो मुंबईत. 'मनोरा' मध्ये बुकिंगही झालं होतं पण पाटीलसाहेब म्हणाले बरोबरच जाऊ सकाळी... (सर्व शांत) काय अडचण असली तर बोलतो म्हणाले... आय फेल्ट व्हेरी सॉरी, फॉर माय कमिंग लेट.

ताम्हणकर : नो प्रॉब्लेम, रात्रीच बोलले होते पाटीलसाहेब माझ्याशी...

पुराणिक : शिक्षण किती झालं तुमचं?

माने : बी. एस्सी. ॲग्रीकल्चर... आणि त्यानंतर पुण्याला सिंबायोसिसमध्ये जर्न्यालिझमचा डिप्लोमा...

लोखंडे : ओके, ही कम्युनिकेशन ऑफीसरची नोकरी मिळाली तर काय करणार तुम्ही?

माने : दुसरं काय करणार साहेब? मनात विचार आला मंत्रालयातली नोकरी करुन बघावी, राज्याचं ॲडमिनिस्ट्रेशन कसं चालतं ते जवळनं बघता येईल. भविष्यात उपयोग होईल त्याचा...

लोखंडे : भविष्यात उपयोग म्हणजे? नेमकं काय म्हणायचंय तुम्हाला?

माने : (हसत) आमच्या अनेक पिढ्या राजकारणात आहेत साहेब, यू नो. आज ना उद्या आमालापण तेच करावं लागणार... तोपर्यंत सगळीकडचा थोडा थोडा अनुभव घेऊन बघावा म्हटलं...

पुराणिक : विधानसभेत आमदार किती?

माने : एक ॲन्लोइंडियन प्रतिनिधी धरुन दोनशे एकोण्णव्वद!

ताम्हणकर : पाऊस पडत नाही म्हणून राज्याच्या एखाद्या भागात दुष्काळ जाहीर करायचा झाला तर कोणत्या महिन्यापर्यंत वाट पहाण्याचे संकेत आहेत?

माने : (एकदम हसत) खरं सांगायचं तर राज्यात सत्ताधाऱ्यांना पैशे कमी पडायला लागले की दुष्काळ जाहीर करावा लागतो, महिना कोणता ते महत्वाचं नाही. (हसतो)

पुराणिक : समाजातला भ्रष्टाचार रोखण्यासाठी काय करता येईल?

माने : भ्रष्टाचार कशाला म्हणता तुम्ही? कामं लवकर व्हावी असं सगळयांनाच वाटतं. त्यासाठी काही देणं-घेणं झालं तर त्यात गैर काय? खुशीचा मामला असतो तो. ज्या देशात भ्रष्टाचार चालतो त्या देशाची प्रगती झपाट्यानं व्हतीय की, फायली पटापट हलतात तिथल्या.

ताम्हणकर : कोण म्हणतं असं?

माने : म्हणायला कशाला हवं, जगजाहीर आहे ते अगदी! जिल्हा पातळीवर सहा लाख रुपयापर्यंतच्या भ्रष्टाचाराला मान्यता द्यावी असं अरुण भाटियांनी जाहीरपणे नाही का सुचवलं? तशाच रकमा जर विभागीय आणि राज्यपातळीवर ठरवून घेतल्या तर झपाट्यानं विकास होईल आपल्या राज्याचा...

लोखंडे : म्हणजे प्रामाणिकपणा, मेहनत, अभ्यास, निष्ठा या मूल्यांना महत्व नाही?

माने : महत्त्व नाही असं मी कुठं म्हणतोय? पण सगळ्यात जास्त महत्व असतं ते संबंधाना...

पुराणिक : म्हणजे?

माने : आमचे एक पाव्हणे मागं एमपीएस्सीचे मेंबर होते. त्यांच्या पांगळ्या मुलीशी लग्न करायला कोण तयारच होत नव्हतं. शेवटी माझ्या काकांनी केलं लग्न. डेप्युटी कलेक्टर म्हणून सिलेक्ट झाले ते, लगेच. पुढं कमीशनर पदापर्यंत जाऊन रिटायर झाले. मग सांगा संबंध सर्वात महत्वाचे नाहीत का?

(सारे त्याच्या औधत्यानं अचंबित झालेले. तो ब्रिफकेस उघडून त्यांतून नोटांची काही बंडले काढतो आणि एकेक गड्डी एकेकाच्या हातात कोंबत "आय अम व्हेरी सॉरी, आय डोन्ट फील प्राऊड फॉर व्हॉट आय अम डुईंग, बट प्लीज अक्सेप्ट धिस... ही घ्या... माझी ओरिजीनल सर्टिफिकेट्स समजा! घ्या... घ्या ... घ्या की! माझ्या बॅगेत काही कॅमेरा वगैरे लावलेला नाही, काळजी करू नका, घ्या!" असं म्हणून रिकामी बॅग बंद करत मस्तवालपणे हसू लागतो. तिघेही स्तंभित झालेले. एकमेकांकडे पाहत आहेत. संगीत. हळूहळू अंधार.)

**मध्यंतर**

***

सूचना :

(सूचना : या नाटकाची पूर्ण संहिता प्राप्त करून घ्यावयाची असल्यास वेबसाईटमध्ये दिलेल्या पत्त्यावर लेखकाशी संपर्क साधावा.

नाटकाचे सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत. प्रयोगापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. या नाटकाचे भाषांतर, रूपांतर, त्यावर आधारित चित्रपट, चित्रमालिका, वेब-सिरीज, त्याचे अभिवाचन, यूट्युब/ फेसबुकवरील किंवा कोणत्याही प्रकारच्या माध्यमातून पूर्ण किंवा अंशत: अशा पातळीवर कोणत्याही प्रकारचा आविष्कार करण्यापूर्वी, तसेच त्याचे चित्रिकरण, ध्वनिमुद्रण इ.पूर्वी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.)

***